कंपनी अधिनियम २०१३ अंतर्गत तयार करण्यात आलेल्या नियमांचे व त्यावर आधारित अंतर्गत उत्तम व्यवस्थापन संबंधी तरतूदीचे अनुपालन करणेबाबत.....

महाराष्ट्र शासन

वित्त विभाग

शासन निर्णय क्रमांकः शासाउ १०.१५/ प्र. क्र. ६५/ साउ,

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
तारीख: २१/१/२०१६.

वाचा :-

१) कंपनी अधिनियम, १९५६,
२) कंपनी अधिनियम, २०१३,
३) कंपनीज (मिटींग्ज ऑफ बोर्ड ॲन्ड इट्स पॉवर्स) नियम, २०१४.

प्रस्तावना :-

राज्य सार्वजनिक उपक्रम हे कंपनी अधिनियम, १९५६ सांविधिक अधिनियम व संस्था अधिनियम, १९६० अंतर्गत स्थापन करण्यात आले आहेत.

राज्य सार्वजनिक उपक्रमाचे खालीलप्रमाणे तीन प्रकार आहेत :-

१) राज्य शासनामार्फत ज्या सार्वजनिक उपक्रमांची स्थापना कंपनी अधिनियम, १९५६ अंतर्गत झाली आहे. तसेच महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ याची स्थापना संस्था अधिनियम, १९६० अंतर्गत करण्यात आली आहे, त्या सर्व उपक्रमांना **"सार्वजनिक उपक्रम/शासकीय कंपनी"**असे संबोधण्यात येते.

२) ज्या सार्वजनिक उपक्रमांची स्थापना सांविधिक अधिनियमाद्वारे करण्यात आली आहे त्यांना **"सांविधिक उपक्रम"** असे संबोधण्यात यावे.

३) ज्या शासकीय संस्था/मंडळे/परिषदा यांची स्थापना संबंधित अधिनियम/संस्था अधिनियम, १९६० अन्वये करण्यात आली आहे त्यांना **"विभागीय उपक्रम"** असे संबोधण्यात यावे.

२. केंद्र शासनाने कंपनी अधिनियम, १९५६ मध्ये सुधारणा केली असून कंपनी अधिनियम, २०१३ हा नवीन अधिनियम अंमलात आलेला आहे. कंपनी अधिनियम, २०१३ मधील कलम १७३, १७५, १७७, १७८, १७९, १८४, १८५, १८६, १८७, १८८, १८९, १९१ या मधील तरतूदीसंदर्भात कलम ४६९ मधील अधिकारान्वये केंद्र शासनाने कंपनी अधिनियमांतर्गत नोंदणी झालेल्या कंपन्यांनी कशा प्रकारे कामकाज करणे अपेक्षित आहे, याबाबत नियम अधिसूचित केले आहेत. या नियमास कंपनीज (मिटींग्ज ऑफ बोर्ड ॲन्ड इट्स पॉवर्स) नियम, २०१४ म्हणुन संबोधण्यात आले आहेत. सदर नियम दिनांक ३१.३.२०१४ रोजीच्या अधिसूचनेन्वये प्रसिध्द करण्यात आले आहेत. हे नियम व कंपनी अधिनियमांतर्गत तयार करण्यात आलेल्या / येणा-या इतर नियमातील तरतुदी ह्या कंपनी अधिनियम, १९५६ आणि कंपनी अधिनियम, २०१३ अंतर्गत स्थापन झालेल्या राज्य सार्वजनिक उपक्रमांना लागू आहेत. या नियमातील तरतुदीनुसार संबंधित सार्वजनिक उपक्रम/ महामंडळ यांनी कामकाज करणे आवश्यक आहे.

कंपनी अधिनियम १९५६ अंतर्गत स्थापन झालेल्या सार्वजनिक उपक्रमांना कंपनी अधिनियम, २०१३ मधील तरतुदी आपोआप लागू होतात. उदाहरणार्थ- सिडको, मेट्रो रेल कॉर्पोरेशन, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, महावितरण, महाजेनको, महाट्रांसको, महाराष्ट्र एअरपोर्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन, महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ इत्यादी.

३. राज्यातील जे सार्वजनिक उपक्रम / महामंडळे हे सांविधिक अधिनियम अथवा संस्था अधिनियम,१९६० अन्वये स्थापित झाले आहेत, उदाहरणार्थ - झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरण , महाराष्ट्र राज्य गृहनिर्माण विकास प्राधिकरण, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, गोदावरी-मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ इत्यादी, हे जरी कंपनी अधिनियम, १९५६ किंवा कंपनी अधिनियम, २०१३ प्रमाणे नोंदणीकृत नसले तरी त्यांना कंपनी अधिनियम, २०१३ आणि कंपनीज (मिटींग्ज ऑफ बोर्ड ॲन्ड इट्स पॉवर्स) नियम २०१४ अंतर्गत उत्तम व्यवस्थापना संबंधीच्या महत्वाच्या तरतूदी लागु करणे आवश्यक वाटते.

४. तसेच, अशा शासकीय संस्था/ मंडळे / परिषदा इत्यादी जे सार्वजनिक उपक्रम संज्ञेमध्ये समाविष्ट नाहीत, उदाहरणार्थ- महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, राष्ट्रीय आरोग्य मिशन अंतर्गत स्थापित सोसायटी, सर्व शिक्षा अभियान अंतर्गत सोसायटी, एड्स नियंत्रण सोसायटी इत्यादी, ज्यांना राज्याच्या एकत्रित निधीतून अनुदान / निधी उपलब्ध करुन देण्यात येतो या सर्वांनी मॉडेल कॉर्पोरेट गव्हर्नंस तरतूद / उत्तम व्यवस्थापना संबंधीच्या उपयुक्त सूत्रांचे अनुपालन केल्यास या उपक्रमांच्या प्रशासकीय व वित्तीय व्यवस्थापनामध्ये निश्चित रूपाने सुधारणा होईल.

५. म्हणुन राज्य सार्वजनिक उपक्रम / महामंडळ / प्राधिकरण / शासकीय संस्था / मंडळे / परिषदा जे सांविधिक अधिनियम अथवा संस्था अधिनियम, १९६० अन्वये स्थापित झाले आहेत, तसेच अशा शासकीय संस्था / परिषद इत्यादी ज्यांना राज्याच्या एकत्रित निधीतून अनुदान / निधी उपलब्ध करुन देण्यात येतो, त्यांनी देखील सदर नियमातील महत्वाच्या तरतुदींचे अनुपालन करण्यासाठी बंधनकारक करणे व त्यांनी त्यानुसार कामकाज करण्याचे निदेश देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

१. राज्यातील जे सार्वजनिक उपक्रम/महामंडळे कंपनी अधिनियम, १९५६ अथवा सांविधिक अधिनियम किंवा संस्था अधिनियम १९६० अंतर्गत स्थापन करण्यात आलेली आहेत त्यांना कंपनी अधिनियम, २०१३ मधील तरतुदी तसेच कंपनी अधिनियम, २०१३ अंतर्गत जारी कंपनीज (मिटींग्ज ऑफ बोर्ड ॲन्ड इट्स पॉवर्स) नियम २०१४ मधील Good Corporate Governance संबंधीचे सूत्र काही फेरबदलासह लागू करण्यात येत आहे.

२. या व्यतिरिक्त ज्या शासकीय संस्था/ मंडळे / परिषदा इत्यादी संबंधित अधिनियम अथवा संस्था अधिनियम १९६० अंतर्गत स्थापन करण्यात आलेली आहेत व ज्यांना राज्याच्या एकत्रित निधीतून अनुदान / निधी उपलब्ध करुन देण्यात येतो, उदाहरणार्थ - महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, राष्ट्रीय आरोग्य मिशन अंतर्गत स्थापित सोसायटी, सर्व शिक्षा अभियान अंतर्गत सोसायटी, एड्स नियंत्रण सोसायटी इत्यादी, त्यांनी देखील खाली नमुद मॉडेल कॉर्पोरेट गवर्नन्स सूत्रांचे अनुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे.

३. गुड कॉर्पोरेट गव्हर्नसचे तत्त्व (Principles of Good Corporate Governance)-

i) संचालक मंडळाच्या समित्या (Committee of the Board):-.

कंपनीज (मिटींग्ज ऑफ बोर्ड ॲन्ड इट्स पॉवर्स) नियम, २०१४ या नियमातील नियम क्र. ६ मधील तरतुदीनुसार प्रत्येक सार्वजनिक / सांविधिक उपक्रमाच्या संचालक मंडळाने लेखापरीक्षण समिती (Audit Committee), नामनिर्देशन समिती (Nomination Committee) व पारिश्रमिक समिती (Remuneration Committee) स्थापन करणे आवश्यक आहे. परंतु, या समित्या स्थापन करताना कंपनीज (मिटींग्ज ऑफ बोर्ड ॲन्ड इट्स पॉवर्स) नियम, २०१४ या नियमातील नियम क्र. ६ मधील तरतुदीनुसार विहित करण्यात आलेले महामंडळाचे अधिकृतभाग-भांडवल, वार्षिक उलाढाल, कर्ज, ठेवी इत्यादींची किमान मर्यादा लागु राहणार नाही. म्हणजे वरील नमुद केलेले राज्य स्तरावरील सर्व सार्वजनिक उपक्रम / सांविधिक उपक्रम व सार्वजनिक शासकीय संस्था / मंडळे / परिषदा यांनी लेखापरीक्षण समिती (Audit Committee), नामनिर्देशन समिती (Nomination Committee) व पारिश्रमिक समिती (Remuneration Committee)) ची स्थापना करणे अनिवार्य राहील. तसेच संस्था अधिनियम १९६० व संबंधित अधिनियमयाअन्वये स्थापन करण्यात आलेल्या शासकीय संस्था / मंडळे / परिषदा यांनी आवश्यकतेनुसार जिल्हा तसेच विभागीय स्तरावर लेखापरीक्षण समिती (Audit Committee), नामनिर्देशन समिती (Nomination Committee) व पारिश्रमिक समिती (Remuneration Committee) यांची स्थापना करणे आवश्यक राहील..

सार्वजनिक उपक्रम /सांविधिक उपक्रम, शासकीय संस्था / मंडळे / परिषदा यावर नियुक्ती करण्यात आलेल्या प्रमुख लेखाधिकारी यांची भांडवली गुंतवणूक/खर्च इत्यादि वित्तीय बाबी संदर्भात लेखी मत घेतल्याशिवाय संबंधित सार्वजनिक उपक्रम / सांविधिक उपक्रम, शासकीय संस्था / मंडळे / परिषदा यांनी भांडवली गुंतवणूक / खर्च इत्यादी वित्तिय बाबी संदर्भात कोणतेही निर्णय घेऊ नयेत.

ii) दक्षता यंत्रणेची स्थापना (Establishment of Vigilance Mechanism):-

कंपनीज (मिटींग्ज ऑफ बोर्ड ॲन्ड इट्स पॉवर्स) नियम, २०१४ या नियमातील नियम क्र. ७ मधील तरतुदीनुसार प्रत्येक सार्वजनिक उपक्रम / सांविधिक उपक्रम व सार्वजनिक शासकीय संस्था / मंडळे / परिषदा यांनी त्यांच्या संचालक / सदस्य व कर्मचारी यांच्या योग्य अशा कल्पना/अडचणी जाणून घेण्याकरीता दक्षता यंत्रणेची (Vigilance System) स्थापना करणे आवश्यक आहे.

iii) संचालक मंडळाचे अधिकार (Powers of Board):-

अ) कंपनीज (मिटींग्ज ऑफ बोर्ड ॲन्ड इट्स पॉवर्स) नियम २०१४ या नियमातील नियम क्र. ८ मधील तरतुदीनुसार प्रत्येक सार्वजनिक उपक्रम / सांविधिक उपक्रम यांच्या संचालक मंडळाने किंवा शासकीय संस्था / मंडळे / परिषदा यांच्या व्यवस्थापन समितीने त्यांच्या उपक्रमातील प्रमुख व्यवस्थापकीय अधिकारी (Key Managerial Personnel-KMP) यांची नियुक्ती करणे तसेच अंतर्गत लेखापरीक्षक (Internal Auditor) यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे. याकरीता, उपक्रमातील प्रमुख व्यवस्थापकीय अधिकारी (Key Managerial Personnel-KMP) ची परिभाषा कंपनी अधिनियम, २०१३ चे कलम २ (५१) वर दिल्याप्रमाणे आहेत.

ब) Key Managerial Personnel-KMP या पदावर सरळ सेवेद्वारे नियुक्ती करावयाची झाल्यास योग्य उमेदवाराची निवड प्रक्रिया पार पाडण्याकरीता प्रत्येक सार्वजनिक उपक्रम / सांविधिक उपक्रमामधील संचालक मंडळाने तसेच शासकीय संस्था / मंडळे / परिषदा यामधील व्यवस्थापन समितीने नियुक्ती समिती (Appointment Committee) गठित करावी. मात्र, यामध्ये शासनाकडून नियुक्त करण्यात येणा-या अधिका-यांच्या नियुक्तीसाठी या नियुक्ती समितीचा संबंध असणार नाही.

क) तसेच सार्वजनिक उपक्रम /सांविधिक उपक्रम, शासकीय संस्था / मंडळे / परिषदा यांनी आवश्यकतेनुसार समवर्ती लेखापरीक्षण (concurrent audit) ची व्यवस्था करावी.

ड) सार्वजनिक उपक्रम/सांविधिक उपक्रम, शासकीय संस्था / मंडळे / परिषदा यांनी व्यावसायिक तत्वावर भांडवली गुंतवणुकीचे प्रकल्प मंजूरी संबंधीचे प्रस्ताव शासनास सादर करण्यापूर्वी त्याप्रकल्पाची तांत्रिक - आर्थिक सक्षमतेबाबत मूल्यमापन (techno economic feasibility appraisal) एक सक्षम, conflict of interest नसलेल्या त्रयस्थ संस्थेकडून करून घेणे आवश्यक राहील व त्या प्रकल्पाच्या प्रस्तावास सार्वजनिक उपक्रम / सांविधिक उपक्रमाच्या संचालक मंडळाची आणि शासकीय संस्था / मंडळे / परिषदा यांच्या व्यवस्थापन समितीची रीतसर मान्यता मिळाल्याशिवाय असे प्रकल्पाचे प्रस्ताव शासनाच्या मंजूरी करीता सादर केले जाणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

iv) संचालकांनी उपक्रमासंदर्भातील हीत उघड करणे (Disclosures by a Director of his interest):-

कंपनीज (मिटींग्ज ऑफ बोर्ड ॲन्ड इट्स पॉवर्स) नियम २०१४ या नियमातील नियमक्र. ९ मधील तरतुदीनुसार सार्वजनिक उपक्रम/सांविधिक उपक्रम, शासकीय संस्था / मंडळे / परिषदा यांच्या प्रत्येक संचालकाने / सदस्याने त्यांचे उपक्रम/संस्थेमधील हित उघड करणे आवश्यक आहे.

v) संचालकांना द्यावयाचे कर्ज इत्यादी (Loans to Director etc.) :-

कंपनीज (मिटींग्ज ऑफ बोर्ड ॲन्ड इट्स पॉवर्स) नियम, २०१४ या नियमातील नियम क्र. १० ते १६ मधील तरतुदीनुसार प्रत्येक संचालकांना / सदस्यांना द्यावयाचे कर्ज इत्यादीबाबत सार्वजनिक उपक्रम/सांविधिक उपक्रम, शासकीय संस्था / मंडळे / परिषदा यांनी कार्यवाही करणे आवश्यक आहे.

vi). उपरोक्त नियमामध्ये जेथे "केंद्र शासनाला" अहवाल पाठवावा असे नमूद केले असेल, त्याऐवजी कंपनी अधिनियम, १९५६ किंवा कंपनी अधिनियम, २०१३ प्रमाणे नोंदणी न झालेले सार्वजनिक उपक्रम/सांविधिक उपक्रम, शासकीय संस्था / मंडळे / परिषदा यांनी आपला अहवाल "राज्य शासनास" पाठवावा असे विचारात घेऊन त्यानुसार अहवाल राज्य शासनास पाठवावा.

४. वरील नियमात विहीत केलेल्या बाबी विचारात घेऊन संबंधित प्रशासकीय विभागांनी या संदर्भातील स्वतंत्र आदेश तातडीने निर्गमित करावेत.

५.   सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१२११२२२०९२७०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

KUMAR BIJAY

Digitally signed by KUMAR BIJAY
DN: c=IN, o=FOOD CORPORATION OF INDIA, ou=FCI HQ NEW DELHI, postalCode=110001, st=DELHI, cn=KUMAR BIJAY
Date: 2016.01.21 12:25:28 +05'30'

(विजय कुमार)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. राज्यपालांचे सचिव
२. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
३. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक
४. सर्व विधान मंडळ सदस्य
५. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे स्वीय सहायक,
६. मंत्रालयातील सर्व प्रशासनिक विभागांचे अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव /सचिव/
७. सर्व सार्वजनिक उपक्रमाचे व्यवस्थापकीय संचालक / मुख्य कार्यकारी अधिकारी,
८. मंत्रालयातील सर्व प्रशासनिक विभाग
९. * प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र,मुंबई ४०० ०२०
१०.* महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई ४०० ०२०
११.* महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर
१२.* महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर
१३.अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१
१४.संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
१५.मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई
१६.* प्रधान सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई
१७.* विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली .
१८ सर्व जिल्हा परिषदांचे अर्थ विभागातील मुख्यलेखा व वित्त अधिकारी
१९. बहूजन समाजपार्टी, डी-१, इन्साहटमेंट, आझाद मैदान, मुंबई-१

२०. भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ. बॅरॅक नं.१, योगक्षेमसमोर,वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई४०० ०२०,

२१. भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभवन, एस.व्ही, पटेल रोड, मुंबई-४०० ००४

२२. भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोबमिल पॅलेस, वरळी, मुंबई-४०० ०१३

२३. इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेय (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-४०००० २

२४. नॅशनलीस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई-४०० ०२१.

२५. शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-४०० ०२८,

२६. महाराष्ट्र नवनिर्माण सेना, राजगड, दादर, मुंबई

२७. वित्त विभागातील सर्व कार्यासने

२८. निवडनस्ती, सार्वजनिक उपक्रम, वित्तविभाग

* पत्राव्दारे.